# दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला.

## {मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक }

|| सहकारेण जनकल्याणम् ||

**प्रशासकीय कार्यालय :**"जनकल्याण ", ५८/५९,तोष्णीवाल ले-आऊट,दुध डेअरी,मुर्तिजापुर रोड,अकोला-४४४००१[महा.]

**मुख्य शाखा, अकोला :-"जनकल्याण", रयत हवेली जवळ, जुने कॉटन मार्केट,तिलक रोड,अकोला**

## स्थावर मालमत्तेची विक्रीची जाहिर निविदा सुचना (तिसरी वेळ)

(दि सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट 2002 आणि दि सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स 2002 चे नियम 6,7,8 व 9 सह वाचावे.)

थकबाकीदार १) दैनिक अकोला दर्शन प्रो.प्रा. प्रभाकर देवीदास पाठक र. अकोला (कर्जदार), २) गजानन देवीदास पाठक रा. अकोला (जमानतदार व गहाणदार), ३) अनिल सखाराम कुळकर्णी रा. बुलढाणा (जमानतदार), ४) नवल गोपालराव मसाळकर रा. अकोला (जमानतदार), ५) यशवंत काशीनाथ करमरकर रा. अकोला (जमानतदार) यांचेकडे सरफेसी कायदा नोटिस दिनांक ११.०८.२०१० नुसार मुदती कर्ज खाते क्र. १००१०५५०००५०३ मध्ये एकुण रक्कम रु. ७२,८५,३६८/- (अक्षरी रु. बहात्तर लक्ष पंच्यांशी हजार तीनशे अडुसस्ट रुपये फक्त) आणि त्यावरील दि. ०१.०८.२०१० पासुनचे व्याज आणि इतर सर्व खर्चाचे वसुली करिता सदरच्या कर्जास गहाण असलेल्या खालील स्थावर मालमत्तेचा ताबा मा. जिल्हादंडाधिकारी, अकोला यांचे आदेश दि. १६.०२.२०१८ नुसार दि अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि., अकोला तर्फे अधिकृत अधिकारी, मुख्य शाखा, अकोला यांनी वरील कायद्यांतर्गत दि. १६.०१.२०१९ रोजी घेतलेला आहे.

खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता **"As is where is basis", "As is what is basis" and "Whatever there is"** या तत्वावर शासकीय कर, आणि इतर सर्व माहिती असलेली व माहिती नसलेली जवाबदारी, हक्क व सर्व देयता स्वीकार करणाऱ्या करीता विक्रीसाठी सिलबंद लिफाफ्यात तिसऱ्यांदा प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर सुचना ही सरफेसी कायदा २००२ चे नियम व तरतुदी नुसार ३० दिवसांची विक्री पूर्वीची सुचना सुद्धा समजण्यात यावी.

### स्थावर मालमत्तेचे वर्णन

मौजे उमरखेड प्र.ता.जि.रसडीरडी अकोला महानगरपालीका अकोला यांचे हद्दीतील उमरी नाका या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागातील शेत सर्वे नं. १/१ मधील प्लॉट नं. ५ ज्याचे मोजमाप पुर्व-पश्चिम ४० फुट, उत्तर-दक्षिण ४० फुट, एकुण क्षेत्रफळ १६०० स्के. फुट ची जागा व त्यावरील असलेल्या १००० स्के. फुट बांधकामासह, ज्यासी चतु:सिमा-

| | |
|---|---|
| पुर्वेस: श्री वाघचवरे यांचा प्लॉट | पश्चिमेस : श्री. काळे यांचा प्लॉट |
| उत्तरेस : रस्ता | दक्षिणेस: श्री. वाघचवरे यांचा प्लॉट |

सदर मालमत्ता श्री.गजानन देवीदास पाठक यांनी बँकेस गहाण दिली असुन त्याचा लिलाव करण्यात येत आहे.

वरील मालमत्तेची राखीव किंमत रु. ५५,३४,०००/- (अक्षरी पंचावन्न लक्ष चौतीस हजार फक्त) बँकेने निश्चित केली असुन, इच्छुक खरेदीदारांनी वरील मालमत्तेचे निरीक्षण/पाहणी दिनांक १०.०८.२०२६ रोजी वर नमुद प्रत्यक्ष जागेवर करता येईल. प्रस्ताव अधिकृत अधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या नियम,शर्ती व अटीस अनुसरूनच असावे. स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे टेंडर फार्म आमचे दि अकोला अर्बन को ऑपरेटीव्ह बँक लि., अकोला. मुख्य शाखा अकोला या पत्त्यावर दिनांक १०.०८.२०२६ ते २८.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० पर्यन्त कार्यालयीन कामकाजाचे दिवशी रुपये ५००/- + जीएसटी(अक्षरी पाचशे रुपये + जीएसटी) चा रोख भरणा करून (परत न मिळणारी रक्कम) खलील सही करण्याऱ्या अधिकाऱ्याकडुन प्राप्त करता येईल. जाहिराती मधील स्थावर मालमत्तेच्या निविदे संबंधी असलेल्या नियम, शर्ती व अटी मुख्य शाखेत तसेच आमचे बँकेच्या वेबसाइट www.akolaurban.bank.in वर सुद्धा पाहवयास मिळतील व त्या निविदेमध्ये भाग घेणाऱ्यांवर बंधनकारक राहतील.

प्रस्ताव दोन वेगवेगळ्या सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावयाचे आहेत. ज्या इछुक प्रस्तावकांना जाहिरातमधील नमुद असलेल्या स्थावर मालमत्तेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे. त्यांनी आपला प्रस्ताव (प्रस्तावित किंमत जी राखीव किंमतीपेक्षा जास्त असावी) एका लिफाफ्यात प्रस्तावित रक्कमेच्या 10% अनामत रक्कम, व्याज देय नसलेल्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर "दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला ई. एम. डी. खाते **दैनिक अकोला दर्शन"** या नावाने अकोला येथे देय असलेला व लिफाफ्यावर "EMD A/C **"ई. एम. डी. खाते दैनिक अकोला दर्शन ३री वेळ** असे नमुद करुन सादर करावा. तसेच दुसऱ्या लिफाफ्यात निविदा भरून लिफाफ्यावर "**स्थावर खरेदीचा प्रस्ताव**" असे नमुद करून दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला, चे मुख्य शाखा, अकोला येथे दिनांक २८.०८.२०२६ रोजी दुपारी ४.३० वाजे पर्यन्त दोन्ही लिफाफे सादर करावेत. वरील प्रमाणे प्राप्त झालेले प्रस्ताव **दिनांक २९.०८.२०२६** रोजी सकाळी ११.३० वाजता दि अकोला अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक ली.,अकोला चे मुख्य कार्यालय "जनकल्याण",५८-५९, तोष्णीवाल लेआऊट, मुर्तीजापूर रोड, अकोला-४४४००१ येथे उघडण्यात येईल. त्यावेळी सभागृहात प्रस्तावक उपस्थीत राहु शकतात व इच्छुक प्रस्तावक प्रस्ताव रक्कमेत वाढ सुद्धा करू शकतात. या मालमत्तेच्या हक्काविषयी किंवा त्रयस्थ पक्षाने सांगितलेल्या अधिकाराबाबत किंवा संबंधिताच्या विधिग्राहयतेबाबत अन्य भार/दावे/अधिकार/थकबाकी इत्यादी बाबतीत बँकेची कोणतीही दायित्वे आणि जवाबदारी राहणार नाही. इच्छुक खरेदीदाराने त्याच्या / त्यांच्या समाधानासाठी मालमत्तेशी संबंधीत सर्व बाबींची योग्य ती शहानिशा व खात्री करून घेतली पाहीजे. इच्छुक खरेदीदारास या संदर्भात अधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको यांच्या विरुद्ध कोणताही दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

सर्वात जास्त किंमतीचा प्रस्ताव किंवा कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्विकृत करण्याचे बंधन अधिकृत अधिकाऱ्यांवर राहणार नाही व कोणतेही कारण न देता ते प्रस्ताव नामंजुर करण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्यास राहील.

ठिकाण : अकोला
दिनांक : २३.०७.२०२६

अधिकृत अधिकारी,
दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला,
मुख्य शाखा, अकोला.